Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# जीवननीती

12 Aug 2011, 0554 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

समर्थ रामदास स्वामी यांनी अध्यात्माबरोबरच त्यांनी प्रपंचातल्या अनेक गोष्टींबद्दल सुयोग्य मार्गदर्शन केलं आहे. शेतीच्या संदर्भात, आजच्या आधुनिक युगात, वॉटर मॅनेजमेंट अर्थात जलव्यवस्थापन याला विशेष महत्त्व आलं आहे. समर्थ रामदासांनी १७व्या शतकातच याविषयी सांगून ठेवलं आहे. ते म्हणतात, सकळ जिवा चैतन्य। सकळिका समान। त्रैलोक्याचे महिमान। उदकापाशी।। नदीचे उदक वाहत गेले। तो निरर्थक चालिलें। जरी बांधोनि काढले। नाना तीरीं कालवे।। उदक निगेने वर्तविले। नानाजिनसीं पीक काढिले। पुढे उदकचि जाले। पीक सुवर्ण।। नाना उंच आम्रफळे. अंजीर, ऊस, दाक्ष, केळे। नाना पिके यत्नजळे। निर्माण जाली।।

समर्थ सांगतात की सगळ्या जिवांचे चैतन्य, प्राण असलेले पाणी सर्वांना सारखे जीवन देते, पाणी त्रैलोक्यात महान आहे. पण या पाण्याची गंमत म्हणजे पाणी नुसतेच वाहून दिले तर वाया जाते. पण त्याच पाण्याला अडवले, त्याचे कालवे काढले की मग ते पाणी शेताशेतात नाना पिकं घेते. जणू त्या पाण्याचेच सोने होते. अशा प्रकारे पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून आंबा, अंजीर, ऊस, दाक्ष, केळी अशी पिके घेता येतात. उल्लेखनीय बाब म्हणजे समर्थांनी नावं घेतलेली सारी पिकं कॅश क्रॉप म्हणजे नगदी पिकं आहेत.

पाण्याचे योग्य व्यवस्थापन केले तर शेती फायद्याची होते, याचा अनुभव मी स्वत: शेतकरी झालो, तेव्हा घेतला. २०-२२ वर्षांपूर्वी मी तुळापूरला थोडी शेतजमीन घेतली. तुळापूर परिसरात पाण्याचा आनंदच होता. तिथले शेतकरी पारंपरिक पद्धतीनं फक्त बाजरी आणि कांदा पिकवत होते. मी इस्रायल आणि मॉरिशसमधल्या आधुनिक शेतीतली वॉटर मॅनेजमेंटची कमाल पाहिली होती आणि आमच्या शेतातही तसा प्रयोग करायचे ठरविले. तुळापूरच्या भीमा नदीपासून जवळच्या डोंगरमाथ्यापर्यंत आणि तिथून आमच्या शेतापर्यंत अशी तीन हजार मीटरची पाइपलाइन टाकली. डोंगरावर एक अजस्त्र वॉटर टँक बसविला. नदीचे पाणी पंपाने खेचून या टाकीत साठवून बाराही महिने पाण्याची सोय केली. अशाप्रकारे नदीचे पाणी बांधून काढल्याने त्या रुक्ष मानलेल्या भागात मी दाक्ष, स्ट्रॉबेरी, सीताफळ, कलिंगड, चिकू, पेरू अशी फळं, वेगवेगळ्या भाज्या; ब्राह्मी, अश्वगंधा, अडुळसा, आवळा, कोरफड अशी औषधी वनस्पती लावून फळं, भाज्या, फुलं निर्यात करू लागलो.

समर्थांनी पाण्याबाबत सांगितलेली गोष्ट आयुष्यालाही लागू होते. आपण आपल्यातील गुणांना, कौशल्याला वेळीच वळण लावले नाही, तर आपलेही आयुष्य वाया जाईल. नदीच्या पाण्याला जसे वळण लावणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे आपल्या आयुष्याला वळण लावणे म्हणजे आयुष्याचे ध्येय ठरविणे गरजेचे असते. नाहीतर सोन्यासारख्या आयुष्याची माती होते. आयुष्यात पुढे जायचे असेल, काही मिळवायचे असेल तर नियोजन करून स्वत:च्या आयुष्याला योग्य वळण लावणे आवश्यक आहे. समर्थ रामदासांची 'जलनीती' हीच 'जीवननीती' आहे.

- डॉ. सुधीर निरगुडकर

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768